## सूचना (NOTIFICATION)

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सरळसेवा भरती - २०२१ उमेदवारांना येत असलेल्या अडचणींबाबत.**

उपरोक्त नमूद परीक्षेकरीता परिक्षा फ़ी भरताना Payment Failure बाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. याबाबत संबंधीत यंत्रणेसमवेत दि.२७.०९.२०२१ रोजी बैठक घेऊन सदर तक्रारी बाबत तात्काळ दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. सदर अडचण आलेल्या परिक्षार्थींचे शुल्क त्यांचे खात्यावर ३ - ४ दिवसात जमा होतील. सदर शुल्क परतावा परिक्षार्थींच्या खात्यावर जमा न झाल्यास किंवा दुबार शुल्क जमा झाल्यास म्हाडाच्या खात्यावरील नोंदी तपासून शुल्क परतावा केला जाईल. तक्रारीचे निरीक्षण करताना सदर अडचण UPI द्वारे शुल्क भरणा करणा-या उमेदवारांना येत असल्याने परिक्षार्थींनी शुल्क जमा करताना शक्य असल्यास UPI ऐवजी Internet Banking, Credit Card, Debit Card चा वापर करून शुल्क भरणा करावा. UPI बाबत अडचणीचे निराकरण झालेनंतर UPI वरून शुल्क जमा करण्यास हरकत नसल्याबाबतची सूचना प्रसिध्द करण्यात येईल.

**सचिव**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**